प्रजावाणी 13/04/2023

# धर्माबाद हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या चार आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश

## ८ लाख ७८ हजार रूपयांचे दागिणे हस्तगत; स्थागुशाची कारवाई



नांदेड, दि. १२: धर्माबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत करखेली ते कारेगाव दरम्यान रोडवर विळेगाव शिवारात १० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास अनोळखी चार चोरट्यांनी दोन मोटारसायकलवर येऊन कारेगाव येथील अजित वसंत माने या सराफाला खंजरचा धाक दाखवून त्याच्याकडील सोन्याचांदीचे ११ लाख ३ हजार ६५० रूपयांचे दागिणे जबरीने चोरून नेले होते. या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी या आरोपींना पकडून त्यांच्याकडून दागिणे हस्तगत केले आहेत, अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

सराफ अजित वसंत माने यांच्याजवळील ८६ ग्राम सोन्यांचे व ८ किलो चांगीचे दागिणे चोरट्यांनी जबरीने चोरून नेले होते. याप्रकरणी धर्माबाद पोलीस ठाण्यात कलम ३९४, ३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आरोपींना पकडण्यासाठी स्थागुशाची वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. १२ एप्रिल रोजी स्थागुशाच्या ▪ पान २ वर